# शिक्षण विभाग (प्राथमिक ) जिल्हा परिषद, नांदेड

रेल्वे स्टेशन रोड,जिल्हा व सत्र न्यायालया समोर वजिराबाद,
नांदेड ४३१६०१.

वेबसाईट :- www. zpnanded.in ई-मेल :- ssananded1@gmail.com

जाक्र.जिपनां/शिअप्रा./प्रा.-०१ ब /बदली कँप-1 /२०२५ दिनांक: 17.03.2025

प्रति,
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती सर्व ,
जिल्हा नांदेड

**विषय** : प्राथमिक शिक्षक जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बदली करीता बदली पोर्टलवर शिक्षकांची माहिती अद्ययावत करून अहवाल सादर करणे बाबत .

संदर्भ : १) ग्रामविकास विभाग ,महाराष्ट्र शासन , शासन निर्णय क्रमांक :जिपब-२०२३/प्र.क्र.११८/आस्था-१४ दि.१८-०६-२०२४

२) https://ott.mahardd.com/ या शिक्षक बदली पोर्टल वरील अद्ययावत असलेले वेळापत्रक

वरील विषयी संदर्भाधीन शासन निर्णय व वेळापत्रकाच्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, प्राथमिक शिक्षक जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बदल्या २०२५ साठी आपल्या अधिनिस्त सर्व शिक्षकांची माहिती अद्ययावत करण्याचे काम अंतिम टप्प्यात आलेले आहे.ही बाब आपणास अवगत आहे.

आपल्या अधिनिस्त गटातील कोणताही शिक्षक बदली पोर्टलवर माहिती अद्ययावत करण्यापासून वंचित राहणार नाही याची खात्री करावी . आपल्या अधीनिस्त कार्यरत असलेल्या १००% शिक्षकांची माहिती अद्ययावत झाली पाहिजे.दिनांक १७.०३.२०२५ रोजी रात्री १२:०० शिक्षकांनी स्वत: माहिती अद्ययावत करण्यासाठी बदली पोर्टल चालू राहणार आहे. या वेळेपर्यंत जे शिक्षक आपली माहिती बदली पोर्टलवर अद्ययावत करणार नाहीत अशा शिक्षकांची माहिती गटशिक्षणाधिकारी यांच्या लॉगीन वरून फोर्सली अपडेट करण्याची सुविधा दिनांक १८.०३.२०२५ रोजी उपलब्ध होणार आहे. अशा शिक्षकांची माहिती आपल्या स्तरावरून अद्ययावत करून घ्यावी.कोणत्याही शिक्षकाची कोणतीही माहिती चुकीची किंवा खोटी असणार नाही याची पडताळणी करावी. आपल्या स्तरावरून गोल्डन फाईल डाऊनलोड करावी व सर्व शिक्षकांची माहिती पडताळून घ्यावी .हेतुपुरस्सर जे शिक्षक खोटी माहिती अद्ययावत करून बदली पोर्टलवर सक्रीय राहतील अशा शिक्षकांवर संदर्भ ०१ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करावी. सर्व माहिती पडताळून खालील अहवाल व प्रमाणपत्र दिनांक १८.०३.२०२५ रोजी कार्यालयास सादर करावे .

## बदली पोर्टल शिक्षक माहिती अहवाल

| अ.क्र. | तालुका | तालुक्यातील एकूण कार्यरत शिक्षक संख्या | बदली पोर्टलवर शिक्षकांनी स्वत: माहिती नोंद केलेली एकूण शिक्षक संख्या | गटशिक्षणाधिकारी स्तरावरून फोर्सली माहिती अद्ययावत केलेली शिक्षक संख्या | बदली पोर्टल वर गटशिक्षणाधिकारी स्तरावरून शिक्षक माहिती पडताळणी केलेली एकूण शिक्षक संख्या | बदली पोर्टल वर निष्क्रिय केलेली शिक्षक संख्या | बदली पोर्टलवरील निष्क्रिय शिक्षक संख्या वगळता एकूण सक्रीय शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की , बदली पोर्टलवर तालुक्यातील सर्व शिक्षकांची माहिती अद्ययावत केलेली आहे आणि सर्व शिक्षकांच्या माहितीची पडताळणी करून घेण्यात आलेली आहे.बदली पोर्टलवर कोणत्याही शिक्षकाची माहिती चुकीची नाही ,चुकीची माहिती आढळून आल्यास मी जबाबदार राहील असे मी लिहून देत आहे.

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती ......................

शिक्षणाधिकारी (प्रा)
जिल्हा परिषद नांदेड

प्रतिलिपी,
१)मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.

स्वाक्षरीत
शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद नांदेड